# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबई महानगरपालिकेच्या मैदानांवर सन २०१२ नंतर स्थापन झालेल्या संस्थांना कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी मिळण्याबाबत

**(१) १३४६ (१८-०३-२०२०) श्री.विलास पोतनीस, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या मैदानात सन २०१२ पूर्वी ज्या संस्थांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम आयोजित केले असतील त्याच संस्थांना नवीन कार्यक्रमांसाठी पुन्हा परवानगी देण्याचे मुंबई महानगरपालिकेचे धोरण असल्याने सन २०१२ नंतर स्थापन झालेल्या संस्थांना विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याकरीता सद्य:स्थितीत सदर मैदान उपलब्ध करून देण्यात येणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील खासगी हॉलचे भाडे संस्थांना आर्थिक दृष्टया परवडत नसल्याने मुंबई महानगरपालिकेची मैदाने त्यांच्यासाठी मोठा आधार असल्याने सदर धोरणात सुधारणा करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेप्रमाणेच ठाणे महानगरपालिका हद्दीमधील सन २०१२ पूर्वीच्या संस्थांना नवीन कार्यक्रमासाठी पुन्हा परवानगी देण्याचे धोरण राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने उद्याने, मैदानांच्या मोकळया जागेच्या देखभालीसाठी तयार केलेल्या धोरणाचे स्वरुप काय आहे तसेच धोरणाची अंमलबजावणी करण्यास महानगरपालिकेने सुरुवात केली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १९/०३/२०१३ रोजीच्या परिपत्रकात, मुंबई महानगरपालिकेच्या मैदानात सन २०१२ पूर्वी ज्या संस्थांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम आयोजित केले असतील त्याच संस्थांना नवीन कार्यक्रमांसाठी पुन्हा परवानगी देण्यात येईल असे नमूद केले आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ०२/११/२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये धार्मिक कार्यक्रम खेरीज अन्य कार्यक्रम करण्यास आवश्यक शुल्क व अनामत रक्कम स्विकारुन कार्यक्रम करण्यास परवानगी देण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) ठाणे महानगरपालिकेचे दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृह व इतर क्रिडा संकुले खेळाव्यतिरिक्त इतर बाबींसाठी उपलब्ध करुन देण्यात येऊ नये असे धोरण ठाणे महानगरपालिकेने यापूर्वीच दिनांक २५/०८/२०११ रोजी निश्चित केले आहे. तसेच दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृह खेळाव्यतिरिक्त अन्य बाबींसाठी उपलब्ध करुन देण्यात येऊ नये असे आदेश ठाणे महानगरपालिकेच्या तत्कालीन आयुक्तांनी दिले असून, दिनांक २५/०८/२०११ रोजीच्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी दक्षता क्रिडा अधिकारी/विभागप्रमुख यांच्यावर सोपविण्यात आली आहे असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर दत्तक धोरणास शासनाकडून स्थगिती देण्यात आली असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुधारीत धोरण तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

## गोरेगाव, मुंबई मधील बेस्टच्या चालकाचा वैद्यकीय उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याबाबत

**(२) १३६३ (१८-०३-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव, मुंबई मधील बेस्टच्या दिंडोशी आगाराचे चालक श्री.बाबाराम आलदर यांना दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास कामावर असताना हृदयविकाराचा झटका आला असता संबंधित आगाराच्या व्यवस्थापनाकडून श्री.आलदर यांना जवळच्या रुग्णालयात दाखल न करता जोगेश्वरी येथील रुग्णालयात नेत असताना वाहतूक कोंडीमुळे रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तातडीने वैद्यकीय उपचार न मिळाल्याने त्यांचे निधन झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यास तातडीने वैद्यकीय उपचार देण्यात कसूर करणाऱ्या बेस्टच्या अधिकाऱ्यांवर शासनाकडून आजतागायत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी सकाळी ०८.०६ वाजता श्री.बाबा रामू अलदर हे दिंडोशी आगारात कर्तव्यावर हजर झाले. तद्नंतर श्री.अलदर यांना त्याच दिवशी सकाळी ०८.३० वाजता अस्वस्थ वाटल्याचे निदर्शनाच येताच त्यांना परिसरातील हृदयविकाराकरीता सुसज्ज असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर" रुग्णालयात दाखल करण्याकरीता दिंडोशी आगारातील स्टाफकार घेऊन प्रस्थान करण्यात आले.

पश्चिम द्रुतगती मार्गावर मुंबईकडे जाणारी मार्गिका ट्राफिक जाम असल्यामुळे बेस्टच्या चालकाने विरुध्द दिशेने नो एन्ट्रीमधून स्टाफकार नेऊन श्री.अलदर यांना त्याच दिवशी सकाळी ९ वाजता ट्रामा केअर सेंटरमध्ये दाखल केले.

तथापि, तेथील कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी श्री.अलदर यांची तपासणी करुन ते सकाळी ०९.११ वाजता मृत झाल्याचे घोषित केले.
(२) सदर प्रकरणी बेस्ट उपक्रमाच्या अधिकाऱ्यांनी/पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांनी श्री.अलदर यांना वैद्यकीय उपचार उपलब्ध करुन देण्यात कोणतीही कसूर केल्याचे दिसून येत नसल्याने त्यांच्यावर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही असे बेस्ट उपक्रमाकडून कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर विभागातील वन मजुरांच्या थकीत वेतनाबाबत

**(३) १४५३ (१८-०३-२०२०) श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अरुणकाका जगताप, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर वनवृत्त विभागामध्ये येणाऱ्या भंडारा, गोंदिया व वर्धा विभागातील हंगामी वन मजुर, बारमाही वन मजूरांसह कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित केले जाते परंतु नागपूर वन विभागातील मजूरांना वेतन मागील आठ महिन्यांपासून प्रदानच केले नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्य वनसंरक्षक नागपूर येथील कार्यालयाकडून सर्व वनपरिक्षेत्रातील मजूरांच्या वेतनासाठी त्या-त्या वेळी निधी उपलब्ध करुन दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य वनसंरक्षक कार्यालयाकडून मजुरांच्या वेतन निधीची तरतूद केलेली असतानाही नागपूर वन विभागातील मजुर कर्मचाऱ्यांचे वेतन गत आठ महिने अदा न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वन विभागातील मजूरांना प्रलंबित वेतन प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (११-१०-२०२१) :** (१) सकाळ या वृत्तपत्रात दिनांक ०७ जानेवारी, २०२० रोजी वनमजुरांचे वेतन थकित असल्याची बातमी प्रसिध्द झालेली होती. सदर बातमी मध्ये मजुरांचे वेतन ८ महिन्यापासून थकित असल्याचे नमूद आहे. तथापि, सदर बाब वस्तुस्थितीवर आधारित नसून दोन ते तीन महिन्याची मजुरी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले होते.

सद्य:स्थितीत माहे जानेवारी-२०२० चे कोणत्याच वनमजुरांचे वेतन थकित नाही.

(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयातून प्राप्त झालेला निधी उपवनसंरक्षक यांना वितरित करण्यात आलेला होता.तसेच जिल्हा योजनेंतर्गत निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून थेट उपवनसंरक्षक कार्यालयास उपलब्ध केला जातो. उपलब्ध निधीनुसार उपवनसंरक्षक कार्यालयाकडून संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयास निधी वितरित केला जातो.

(३) मजुरांची मजूरी प्रामुख्याने योजना व योजनेत्तर शीर्षातून अदा केली जाते. तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन योजना / कॅम्पा मधील ३% आकस्मिक निधीतून दिले जाते. तथापि, नागपूर वनविभागातील मजुर कर्मचाऱ्यांचे वेतन उशिरा होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

अ) अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत डिसेंबर, २०१९ पर्यंत ६०% निधी योजनेत्तर व योजना अंतर्गत निर्गमित झाला होता.

ब) जिल्हा योजनेंतर्गतचा निधी नागपूर वनविभागास सप्टेंबर, २०१९ पासून उपलब्ध होण्यास सुरुवात झालेली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) वरील प्रश्न ३ अनुषंगाने नमूद केल्याप्रमाणे.

---

## पुणे येथे स्वित्झरलँड सरकारच्या सहाय्याने पहिली प्रदूषणमुक्त स्मार्ट टाऊनशिप उभारण्याच्या कराराबाबत

**(४) १६०७ (१८-०३-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात पीएमआरडीएच्या क्षेत्रात स्वित्झरलँड सरकारच्या सहकार्याने भारतातील पहिली कार्बन न्यूट्रल सस्टेनेबल स्मार्ट टाऊनशिप (प्रदूषण मुक्त टाऊनशिप) उभारली जाणार असून याबाबत स्वित्झरलँडचे भारतातील कॉन्स्यूल जनरल ओथमार हारदेगार, पीएमआरडीचे आयुक्त विक्रम कुमार व २००० व्हॅट स्मार्ट सिटी असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी, माधव भागवत यांनी दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास सामंजस्य करार केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वित्झरलँड सरकारच्या मदतीने एकूण १२ टाऊनशिप उभारण्याचे ठरविण्यात आलेले असून पुढील दीड वर्षात या प्रकल्पांच्या अंतर्गत १० कोटी अमेरिकन डॉलरची गुंतवणूक होणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व यासाठी होणाऱ्या गुंतवणूकी संदर्भात कोणत्या अटी निश्चित करण्यात आलेल्या आहेत तसेच उक्त प्रकल्पाचे काम केव्हा सुरु करुन किती कालावधीत पूर्ण करण्याचा विचार आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र शासन आणि २००० वॅट स्मार्ट सिटी असोसिएशन, स्वित्झलँड यांच्या दरम्यान सामंजस्य करारनामा (MOU) झालेला आहे. सदर करारानुसार पुणे महानगर प्रदेशातील Carbon Neutrality & Smart City उभारण्याकरीता तांत्रिक सल्ला देण्यात येणार असून त्यानुसार प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. त्यानुसार स्मार्ट सिटीमध्ये Safe, Energy Efficient Productive, High Quality & Sustainable Environment विकसीत करणे शक्य होईल. पुणे महानगर प्रदेशाचा विकास सुनियोजित पध्दतीने व्हावा याकरीता प्राधिकरणाने दिनांक १९/०९/२०१९ रोजी नगर रचना योजनेखालील जागा निवड करण्याकरीता निविदा क्र. १५४ (Expression Of Interest) जाहीर करून अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर निविदेमधून निवडण्यात येणाऱ्या नगर रचना योजनांचा विकास त्यामध्ये नमुद केलेल्या कोणत्याही आर्थीक विषयानुरुप (Economic Activity) करण्याचे उद्दीष्ट आहे. सदर EIO मध्ये Carbon Neutrality & Smart City उभारण्याकरीता देखील स्वारस्य असलेल्या

व्यक्ती/कंपनी यांनी अर्ज करण्याची तरतुद केलेली आहे. सदरहु प्रकल्पाकरीता उक्त सामंजस्य करारनाम्यानुसार नगर रचना योजनेमध्ये गुंतवणूक करण्याकरीता प्राधिकरण "फॅसिलिटेटर" म्हणून काम पाहणार आहे.प्राधिकरणाकडून सदर निविदा जाहीर झाल्यानंतर प्राधिकरणास एकूण १४ अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर निविदेमध्ये अर्ज करण्याबाबत निकष नमुद करण्यात आलेले असून सदर निविदेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरीता प्राधिकरणाने भू-निवड समिती गठीत केलेली आहे. सदर समितीच्या सदस्यांनी जागा पाहणी केलेली असून, सदर समितीने याबाबत बैठक आयोजित करण्यात आलेली होती. भू-निवड समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने ७ अर्ज धारकांना दिनांक २९/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये कागदपत्रे/माहिती घेऊन दि ०४/११/२०२० रोजी भू-निवड समिती समोर सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यावर कोणत्याही अर्जधारकाकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही. प्राप्त झालेल्या अर्ज धारकांची जागा निश्चित झाल्यानंतर सदर वसाहतीकरीता २००० वॅट स्मार्ट सिटी असोसिएशन, स्वित्झलँड यांचेकडून तांत्रिक सल्ला व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर वसाहती उभारण्याकरीता गुंतवणूक अपेक्षित आहे. वर नमुद केल्यानुसार Carbon Neutrality & Smart City प्रकल्पाची जागा अद्यापही निश्चित झालेली नाही. जागा निश्चित झाल्यानंतर अपेक्षित गुंतवणूक व प्रकल्प कालावधी याबाबत माहिती उपलब्ध होऊ शकेल.

---

## रायगड जिल्हयातील म्हाप्रळ-पंढरपूर रस्त्याच्या रुंदीकरणामुळे खाडीपट्टयात निर्माण झालेल्या समस्येबाबत

**(५) २२३४ (१८-०३-२०२०) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील म्हाप्रळ-महाड-पंढरपूर राज्यमार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरु असून यापुर्वी राजेवाडी ते ओवळे दरम्यान रस्त्यालगत आलेली महाड औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी अत्यंत जीर्ण होवून अनेकवेळा फुटल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता रुंदीकरणाचे काम करताना सांडपाणी वाहिनी पुन्हा फुटण्याची शक्यता असून त्याचा गंभीर परिणाम खाडीपट्टा विभागातील नागरिकांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या रुंदीकरणात बाधित होणारी घरे आणि अन्य मालमत्तेची भरपाई तुटपुंजी असून त्या मालमत्तेचे फेरमुल्यांकन करण्यात यावे अशी मागणी करणारे एक निवेदन खाडीपट्टयातील ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी प्रांतधिकारी, महाड यांचेकडे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१४-१०-२०२१) :** (१) सदर भूमीगत सांडपाणी वाहिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे मुंबई-गोवा महामार्गालगत तसेच म्हाप्रळ-पंढरपूर रस्त्याच्या राजेवाडी ते ओवळे या भागात रस्त्याच्या कडेने २४ कि.मी.लांबीची टाकण्यात आलेली असून सदर वाहिनीची नैमित्तिक दुरुस्ती करण्यात येत असल्याने हे खरे नाही, असे मुख्य अभियंता,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी कळविले आहे.

(२) अंशत: खरे असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे वाहिनी नादुरुस्त झाल्यास तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येवून वाहिनी सुस्थितीत ठेवण्यात येते, असे मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी कळविले आहे.

तसेच खाडीपट्टा भागात राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरु नाही.

(३) हे खरे असल्याचे महसूल विभागाकडील जिल्हाधिकारी, रायगड यांनी कळविले आहे.

(४) व (५) सदरहू राष्ट्रीय महामार्ग ९६५ डीडी च्या रुंदीकरणासाठी महाड तालुक्यातील १८ गावांतील जमिनी संपादन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

एकूण १८ गावांपैकी १५ गावांची कलम ३D अधिसूचना दिनांक २६/०८/२०२० रोजी प्रसिध्द झाली आहे व ३ गावांची कलम ३(A) अधिसूचना दिनांक १५/१०/२०२० रोजी प्रसिध्द झाली आहे. त्यानुसार ३G(१) निवाड्यांना भूसंपादन सल्लागार यांची मान्यता व त्यासंबंधित पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यातील खाजगी शाळांच्या अवाजवी शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय शुल्क नियामक समिती व पुनर्रीक्षण समिती गठीत करण्याबाबत

**(६) ३०३५ (०२-०६-२०२०) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ७६ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शाळांच्या अवाजवी शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय शुल्क नियामक समिती व पुनर्रीक्षण समितीची मुदत सद्य:स्थितीत संपलेली असल्याने खाजगी स्वयं- अर्थसहाय्यीत आणि विनाअनुदानित शाळा अवाजवी शुल्क वाढ करण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी शाळांच्या अवाजवी शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यात किती विभागात विभागीय शुल्क नियामक समिती व पुनर्रीक्षण समित्या गठीत करण्यात आल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासन अधिसुचना दिनांक २०/०२/२०२० अन्वये पूनरिक्षण समितीचे गठण करण्यात आले असून शासन अधिसुचना दिनांक ०७/०६/२०२१ अन्वये मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर व औरंगाबाद या ५ विभागात विभागीय शुल्क नियामक समित्यांचे गठण करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १४/०७/२०२१ अन्वये कोल्हापूर, अमरावती व लातुर या ३ विभागांचा अतिरीक्त कार्यभार अनुक्रमे पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागीय शुल्क नियामक समित्यांकडे सोपविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजभाषा मराठीला शिक्षण व्यवस्थेत निश्चित स्थान देण्यासाठी मराठी सक्तीच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(७) ३१३० (०२-०६-२०२०) श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक १२ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजभाषा "मराठी" ला शिक्षण व्यवस्थेत निश्चित स्थान देण्यासाठी विधीमंडळाने कायदा संमत केला असून सदरहू कायद्यानुसार केंद्रीय, आंतरराष्ट्रीय आणि राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न सर्व माध्यमांच्या शाळांना मराठी भाषा शिकविणे अनिवार्य व सक्तीचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कायद्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून करण्याबाबत प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच कायद्याची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०८-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाच्या दिनांक १ जून, २०२० च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून महाराष्ट्र राज्यात राज्यातील सर्व शाळांमध्ये अध्यापन व अध्ययनामध्ये कायद्यान्वये मराठी भाषा सक्तीची करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी मागील वर्षापेक्षा अधिक शुल्क न आकारण्याबाबत

**(८) ३१९९ (०२-०६-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या पार्श्वभुमीवर लॉकडाउनच्या काळात पालकांकडून शुल्क मागणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यात येईल असा निर्णय शासनाने जाहीर केला असून, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून पालकांनी संपूर्ण वर्षाचे शुल्क एकरकमी भरण्यासाठी जबरदस्ती न करता त्यांना सोयीनुसार शुल्क भरण्याची सवलत द्यावी असे देखील सदरहू आदेशात नमूद करण्यात आले आहे, तसेच ज्या पालकांनी मागील शैक्षणिक वर्षाचे शुल्क पूर्ण भरलेले नाही, अशा पालकांना शाळा एसएमएसव्दारे शुल्क भरण्याची विनंती करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकरावी प्रवेशावेळी शैक्षणिक वर्षात शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी मागील वर्षापेक्षा अधिक शुल्क आकारू नये अशी मागणी सिस्कॉम या संघटनेकडून मा.शालेय शिक्षण मंत्री यांना माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काही शाळांनी ऑनलाईन अभ्यास पालकांच्या मोबाईलवर सुरू केला असून त्यानिमित्ताने शुल्क भरा, अशा सूचनाही शाळा करीत असल्याने याविरोधी पालक संघटनांनी एकत्र येवून शासनाला निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पूर्व प्राथमिक ते इयत्ता बारावीपर्यंत शुल्क भरण्यात आले नाही, म्हणून कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेतून काढल्यास सदरहू शाळेवर कारवाई करण्यात येईल असा शासन निर्णय जाहीर करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीनुसार गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या वाढीव शैक्षणिक शुल्काबाबत कार्यवाही करुन शुल्क न मागण्याचा निर्णय झालेला असून शुल्क मागणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) शासन निर्णय दिनांक १२/०८/२०२१ अन्वये कोव्हीड-१९ महामारीच्या काळात विद्यार्थ्यांने शाळेची फी, थकीत फी, भरली नाही म्हणून शाळा व्यवस्थापनाने अशा कोणत्याही विद्यार्थ्यांला प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन पध्दतीने शिक्षण घेण्यास किंवा परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करु नये किंवा अशा विद्यार्थ्यांचा निकाल देखील रोखून धरण्यात येऊ नये. असा निर्णय घेण्यात आला आहे.
(५) याबाबत शासनस्तरावर प्राप्त होणाऱ्या तक्रारी यथास्थिती विभागीय तक्रार निवारण समित्या /क्षेत्रिय कार्यालयांकडे पाठवून तक्रारींचे निराकरण करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मांजरेवाडी (पिंपळ) ते मलघेवाडी (ता.खेड, जि.पुणे) या दोन गावांना जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत

**(९) ३२०३ (२९-०५-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांजरेवाडी (पिंपळ) ते मलघेवाडी (ता.खेड, जि.पुणे) या दोन गावांना जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम गत चार महिन्यांपासून सुरू असून सदर बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामात मुरुमाऐवजी काळया मातीचा वापर करण्यात आला असून सिमेंट व वाळू निकृष्ट दर्जाची वापरली असल्याने सदर सिमेंट व वाळु हाताने असल्याची बाब दिनांक ४ मे, २०२० रोजी निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याने सदर निकृष्ट दर्जाच्या कामाच्या गुणवत्तेबाबत नियंत्रण विभागाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१०-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन कामावर वापरण्यात आलेले साहित्य चाचणी निष्कर्षानुसार मानकाप्रमाणे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अल्पसंख्यांक शाळांसंदर्भात शैक्षणिक धोरण तयार करण्याबाबत

**(१०) ३६११ (२८-०५-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक शाळांना शिक्षणाचा अधिकार (आर.टी.ई.) न्यायालयीन प्रकरणामुळे लागू नसल्याने शासनामार्फत दिनांक ६ मे, २०१७ रोजी अल्पसंख्यांक शाळांबाबत शैक्षणिक धोरण निश्चित करण्याकरीता समिती तयार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने अल्पसंख्यांक शाळासंदर्भात शाळा, विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय व शैक्षणिक याबाबतचे धोरण तयार केले आहे काय, उक्त धोरणाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१०-२०२१) :** (१) सदर समिती शासन निर्णय दिनांक ०६/०५/२०१७ अन्वये गठीत करण्यात आली आहे.

(२) अभ्यासगटाने अल्पसंख्यांकांची आर्थिक स्थिती पहाता निकषांबाबत शिफारशी केल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील फेरीवाल्यांसाठी नवे धोरण आखण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत

**(११) ३९०२ (१४-०९-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टाळेबंदीचा फटका बसलेल्या फेरीवाल्यांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने फेरीवाल्यांसाठी टाळेबंदीत नवे धोरण आखण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे व त्याची अंमलबजावणी कधीपर्यंत होणार आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) १) शासन निर्णय क्रमांक पीएमस्वनिधी-२०२०/प्र.क्र.७७/नवि-२०, दिनांक १७ जून, २०२० अन्वये केंद्र शासन पुरस्कृत "पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM-SVANidhi)" पथविक्रेत्यांसाठी विशेष सूक्ष्म-पतपुरवठा सुविधा योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

२) कोविड-१९ (साथीचा रोग) सर्वत्र पसरलेला असल्यामुळे आणि परिणामी टाळेबंदीमध्ये (Lockdown) पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरित परिणाम केला आहे. बहुदा ते कमी भांडवलावर पथविक्री करतात आणि जे काही भांडवल त्यांच्याकडे होते तेही या टाळेबंदीमध्ये (Lockdown) शिल्लक राहण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे पथविक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी खेळते भांडवलाचा पतपुरवठा तातडीने प्रदान करण्याची आवश्यकता आहे.

३) शहरातील पथविक्रेत्याना त्यांचा व्यवसाय पुन्हा उभा करण्यासाठी योजना राबविण्याबाबत केंद्र शासनाने सूचना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेतंर्गत पात्र पथविक्रेत्या लाभार्थ्यांना रुपये १०,०००/- इतके खेळते भांडवल कर्जाच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर योजनेतंर्गत राज्यात दिनांक ११/०२/२०२१ पर्यंत १,५७,६७२ पात्र पथविक्रेत्यांचे कर्जाचे प्रस्ताव मंजूर असून १,००,९१८ पथविक्रेत्यांना प्रत्येकी रुपये १०,०००/- इतके खेळने भांडवल उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

---

## राज्यातील नगरपालिका व महानगरक्षेत्रातील शाळांना निवासी दराने कर आकारणी केली जात नसल्याबाबत

**(१२) ४९२८ (१४-१२-२०२०) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपालिका व महानगरक्षेत्रातील मराठी, उर्दू व हिंदी माध्यमांच्या शाळांना निवासी दराने कराची आकारणी केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा ह्या धर्मादाय संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत असल्याने व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वेतनाशिवाय त्यांना पुरक अनुदान नसल्यामुळे निवासी दराने कर आकारणी करण्याकरीता होत असलेल्या मागणीबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१) :** (१) व (२) ज्या शैक्षणिक संस्था ह्या धर्मदाय संस्था कायद्यातंर्गत नोंदणीकृत करण्यात आलेल्या आहेत तसेच शाळेची स्वतंत्र इमारत असलेल्या अशा शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तांना निवासी दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते.

मात्र ज्या शैक्षणिक संस्थानी शैक्षणिक कामाव्यतिरिक्त जागेचा वापर वाणिज्य कामासाठी केला असल्यास तेवढ्या वाणिज्य भागास वाणिज्य दराने कर आकारणी केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माध्यमिक शाळेचा वर्ग प्राथमिक शाळेला जोडण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(१३) ५०७१ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० मध्ये जाहीर झाले असून सुमारे ३४ वर्षांपासून अस्तित्वात असलेले शैक्षणिक धोरण बदलून नवीन शैक्षणिक धोरण राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असून त्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे तसेच सदरहू धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णयही राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणात आकृतिबंधाची रचना १०+२ ऐवजी ५+३+३+४ झाली असल्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना पुर्व प्राथमिक, प्राथमिक शिक्षण एकत्र घेण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माध्यमिक शाळेचा इयत्ता ५ वीचा वर्ग प्राथमिक शाळेला जोडण्याचा निर्णय घेतल्यामुळे अतिरिक्त शिक्षकांचे प्रमाण वाढणार असल्याने सदरहू निर्णय रद्द करण्याची मागणी विविध शिक्षक संघटनांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन शैक्षणिक धोरणाची ठळक वैशिष्टये काय आहेत, सदर नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी केव्हा निर्णय घेण्यात आला आहे व त्यावर केव्हापासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इयत्ता ५ वीचा वर्ग प्राथमिक शाळेला जोडण्याचा आदेश रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१०-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर निर्णयामुळे अतिरिक्त शिक्षकांचे प्रमाण वाढणार हे खरे नाही. तथापि, सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत विविध शिक्षक संघटनांकडून मागणी होत आहे.

(४) नवीन शैक्षणिक धोरणामध्ये ०६ भाग व २९७ उद्दिष्टे (Tasks) असून, विविध मुद्द्यांवर गरजेप्रमाणे राज्य शासनामार्फत निर्णय घेण्यात येईल.

(५) इयत्ता ५ वी च्या वर्गावरील कार्यरत शिक्षकांचे समायोजन करण्यात येणार असल्याने शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. सबब सदर शासन निर्णय रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विद्‌यार्थ्यांचे यंदाचे आणि पुढचे शैक्षणिक वर्ष क्लब करण्याच्या होत असलेल्या मागणीबाबत

**(१४) ५१६९ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना परिस्थितीमुळे यंदाचे शैक्षणिक वर्ष माहे जानेवारीपासून सुरू करण्याची घोषणा मा.शालेय शिक्षणमंत्री यांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना काळात विद्‌यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरुन काढण्यासाठी यंदाचे आणि पुढचे शैक्षणिक वर्ष क्लब करण्याबाबत शिक्षण तज्ज्ञांकडून होत असलेल्या मागणीबाबत शासनाची काय भूमिका आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्‌यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी शिक्षकांना कोविड डयुटी आणि अन्य अशैक्षणिक कामातून विनाविलंब मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) शिक्षण तज्ज्ञांकडून अशी कोणतीही मागणी शासनास प्राप्त झालेली नाही.
(३) ज्या शिक्षकांची सेवा कोविड आजारासंबंधित कामकाजासाठी अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत त्यांना कार्यमुक्त करण्याबाबत संबंधित शिक्षणाधिकारी यांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधून कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोईसर औद्योगिक वसाहतीमध्ये कचरा प्रक्रिया केंद्र सुरु करण्याबाबत

**(१५) ५३१३ (१२-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर औद्योगिक वसाहतीमधील १२५० कारखान्यांमधून निर्माण होणाऱ्या रासायनिक घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता बोईसर येथे कचरा प्रक्रिया केंद्र नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोईसर औद्योगिक वसाहतीमध्ये कचरा प्रक्रिया केंद्र सुरु करण्याकरीता भूखंड मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने औद्योगिक वसाहतीमध्ये कचरा प्रक्रिया केंद्राकरीता भूखंड उपलब्ध करून देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-१०-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०४/०२/२०२१ रोजीच्या बैठकीत रासायनिक कचरा प्रक्रिया केंद्राकरीता भूखंड वाटप करण्यास तत्वत: मंजूरी दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या सागरी मार्गाच्या कामाबाबत

**(१६) ५३८१ (१४-१२-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या महत्वाकांक्षी सागरी मार्गाच्या कामावरील बंदी सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास उठविलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व सदर काम किती कालावाधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रिन्सेस स्ट्रीअ उड्डाणपूल ते वांद्रे वरळी सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंतच्या किनारी रस्त्याचे काम हाती घेतले आहे.

सदर प्रकल्पामध्ये ४ + ४ मार्गिका प्रस्तावित असून प्रकल्पाची सुधारीत लांबी १०.५८ कि.मी. आहे. याव्यतिरिक्त सदर प्रकल्पामध्ये २ बोगदे, २ आंतरबदल, भराव, भरावावर रस्ता, पूल, सागरी पदपथ, सागरी तटरक्षक भिंत इत्यादींचा समावेश आहे.

सदर प्रकल्पाचा एकूण खर्च (बांधकाम खर्च, सादिलवार व पर्यवेक्षण आकारासह) रुपये १२,७२१ कोटी इतका आहे. सदर खर्च बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पाच्या कामास माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये सुरुवात करण्यात आली असून, सदर प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी ४ वर्षे इतका आहे.

तथापि, सदर प्रकल्पाविरोधात मा.उच्च न्यायालयात एक याचिका व पाच जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सदर याचिकांप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष सूट याचिका दाखल करण्यात आली होती.

सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक १८/१२/२०१९ पासून किनारी रस्ता प्रकल्पाचे काम पुन्हा सुरु झाले आहे.

आजपर्यंत सदर किनारी रस्ता प्रकल्पाचे ३२ टक्के काम झाले असून, सद्य:स्थितीत सदर काम माहे जुलै, २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यातील प्रदूषित झालेल्या शहरातील प्रदूषण कमी करण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१७) ५३८७ (१८-११-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्डाकडील आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील अकोला, अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, नागपूर, सांगली, मुंबई, नाशिक, नवी मुंबई, भिवंडी, पुणे, सोलापूर, ठाणे, डोंबिवली, उल्हासनगर आणि बदलापूर या शहरांना देशातील सर्वात जास्त प्रदूषित शहरात समाविष्ट केल्याने राज्यातील नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य शासनाकडून आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार प्रदुषणावर नियंत्रण आणण्याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यस्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण समितीच्या मान्यतेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाणे निरी, नागपूर व आय.आय.टी., मुंबई यांच्यासमवेत तयार केलेला हवा प्रदूषण नियंत्रणाकरीता सर्व समावेशक कृती आराखडा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या त्रिसदस्यीय समितीने संमत केला आहे.

कृती आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यामध्ये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती, मा.प्रधान सचिव, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण समिती व जिल्हाधिकारी/आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नागरी समिती अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली आहे.

सदर समित्यांमार्फत विविध भागधारक संस्थांसोबत वेळोवेळी बैठका घेऊन कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत नियमितपणे आढावा घेतला जातो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांना ऑनलाईन अध्ययन-अध्यापनाची साप्ताहिक माहिती लिंकवर भरण्यासंदर्भातील परिपत्रक रद्द करण्याबाबत

**(१८) ५५६३ (१८-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांना ऑनलाईन अध्ययन-अध्यापनाची साप्ताहिक माहिती लिंकवर भरण्यासंदर्भात शासनाने काढलेले परिपत्रक शिक्षकांवरील अविश्वास असून या प्रक्रियेवर शिक्षक संघाच्यावतीने बहिष्कार घातल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शिक्षक ऑनलाईन अध्यापन करीत असून विद्यार्थ्यांना व्हॉट्सअपच्या माध्यमातून ग्रुप तयार करुन त्यांना अभ्यास देणे व तपासणे, स्वाध्याय पुस्तिका विकसित करुन विद्यार्थ्यांपर्यंत पोहच करणे असे विविध शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांना कोविडच्या कामातून कार्यमुक्त करण्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने काढलेल्या आदेशाकडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे तसेच अशैक्षणिक कामे शिक्षकांना देण्यात आली असताना आता साप्ताहिक माहिती परिपत्रक काढण्यात आल्याने सदरहू परिपत्रक रद्द करण्याची मागणी शिक्षक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त परिपत्रक रद्द करुन शिक्षकांना अशैक्षणिक कामातून वगळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

सर्व शिक्षकांनी सदर माहिती दिली नसल्यामुळे किती शिक्षक सदर उपक्रम राबवित आहे ही परिपूर्ण माहिती उपलब्ध झाली नाही.
(३) हे खरे नाही.

अध्ययन-अध्यापनाची साप्ताहिक माहिती भरण्यासाठी एका शिक्षकास केवळ पाच मिनिटांचा वेळ लागतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील समुद्र किनारे स्वच्छ करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१९) ५६३६ (१२-११-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील ठिकठिकाणच्या बंदरावर पावसाळ्याआधी उभ्या असलेल्या परदेशी मालवाहू बोटीतून समुद्रात येणाऱ्या टाकाऊ काळ्या रंगाच्या ऑईलसह विविध प्रकारचा कचरा तसेच भरतीच्या वेळी वाहून जाणाऱ्या आणि परत समुद्रकिनाऱ्यावर वाहून येणाऱ्या कचऱ्यामुळे कोकणातील पर्यटनदृष्ट्या असलेल्या समुद्रकिनाऱ्यांचे महत्त्व कमी झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतात १९ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय किनारा स्वच्छता दिन साजरा होत असताना दुसरीकडे कोकणाचे समुद्रकिनारे कचऱ्याने व्यापल्याचे चित्र दिसत असून सदर समुद्रकिनारे स्वच्छ करण्यासाठी शासनाची कोणतीच यंत्रणा नसल्याने उक्त प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे कोकणातील समुद्रकिनाऱ्यांवर येणाऱ्या पर्यटकांवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणातील समुद्रकिनारे स्वच्छ करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (१२-१०-२०२१) :** (१) महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळाने दिलेल्या अहवालानुसार काळ्या रंगाचे तेलाचे गोळे पालघर, मुंबई, रायगडच्या काही भागात समुद्रकिनाऱ्यावर पावसाळ्यात आढळून येतात.

(२) व (३) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय तेल गळती आपत्ती व्यवस्थापन आराखड्यानुसार, भारतीय तटरक्षक दल (Indian Coast Guard) ही समुद्रामधील प्रदूषण व तेल गळती रोखण्यासाठी केंद्रीय समन्वय संस्था कार्यरत आहे. भारतीय तटरक्षक दल एक सागरी सुरक्षा संस्था असल्याने स्वच्छ समुद्रकिनारे करण्यासाठी प्रोत्साहन देते. तसेच आंतरराष्ट्रीय किनारा स्वच्छता दिन देखील आयोजित करते. त्यामध्ये किनारपट्टी स्वच्छतेच्या संस्कृतीला प्रोसाहन देण्यासाठी तटरक्षक दल व जनमाणसे सहभागी होतात.

(४) तटरक्षक दल किनारपट्टी तेल गळतीच्या परीस्थितीवर लक्ष ठेवते व जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळ व बंदर प्राधिकरण या सारख्या संस्थासह प्रभावीपणे कोकणातील समुद्रे किनारे स्वच्छ करण्यासाठी समन्वय करते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वालधुनी नदीच्या पात्रातील प्रदूषण रोखण्याबाबत

**(२०) ५६५१ (१२-११-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील वालधुनी नदीच्या पात्रात पहाटेच्या वेळी रासायनिक दुर्गंधी पसरत असल्याने नदीकिनारी राहणाऱ्या नागरिकांना श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ तसेच मळमळ यासारखे त्रास झाल्यामुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतरही प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पाहणीत काही आढळून येत नसल्याने, परिसरातील नागरिक याबाबत संताप व्यक्त करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रासायनिक प्रदुषणामुळे अत्यंत बिकट अवस्था झालेल्या वालधुनी नदीच्या प्रदूषण नियंत्रणासाठी अनेक घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात मात्र नदी प्रदुषणावर संबंधित अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वालधुनी नदी प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी राष्ट्रीय हरित लवादाने नदीपात्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे सुचविले असून, अद्याप यावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वालधुनी नदीच्या पात्रातील प्रदूषण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) व (२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांनी बसविलेल्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची वेळोवेळी पाहणी केली जाते. पाहणीवेळी दोषी आढळलेल्या उद्योगांवर कारवाई केली जाते.

दिनांक १०/०१/२०२१ व दिनांक ११/०१/२०२१ रोजी अंबरनाथ शिवमंदीर व अंबरनाथ स्टेशन परिसरातून दुर्गंधी येत असल्याबाबतच्या तक्रारी भ्रमणध्वनीवदारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाल्या

होत्या. सदर तक्रारीस अनुसरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पाहणी करण्यात आली दोषी असणाऱ्या मे. बायोक्झिरा फार्मा प्रा.लि. या उद्योगास दिनांक १३/०१/२०२१ रोजी उत्पादन बंदचे आदेश बजावण्यात आले असून सदर कंपनीविरूध्द दिनांक १३/०१/२०२१ रोजी गुन्हादेखील दाखल करण्यात आला आहे.

(३) मा.राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या आदेशास अनुसरुन नदीपात्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अंबरनाथ/बदलापूर मधील उद्योगांचे सर्वेक्षण करण्यात आले त्यामधील आढळून आलेल्या त्रूटीनुसार जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

त्याचबरोबर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घरगुती सांडपाणी वालधूनी व उल्हास नदीमध्ये सोडणाऱ्या कल्याण डोंबीवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद व बदलापूर नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांना दिनांक २४/११/२०२० व १८/१२/२०२० रोजी निर्देश देण्यात आलेले असून त्यामध्ये नाल्यामधून विनाप्रक्रिया जात असलेल्या घरगुती सांडपाण्यावर तातडीने अल्पकालीन व्यवस्था (Short term Measures), नाला-ईन-सीटू (Nalla-in-situ treatment) प्रक्रिया संयंत्रणा उभारण्याबाबतचा समावेश केलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेच्या नगररचना विभागामधील गैरव्यवहाराबाबत

**(२१) ५६९४ (२०-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या नगररचना विभागातून सत्ताधारी पक्षातील काही पदाधिकारी व नगरसेवकांच्या मर्जीतील विकासकांच्या नियमबाहय कामाच्या संदर्भातील प्रस्तावित नस्ती पाच महिन्यापूर्वी महानगरपालिकेच्या नगररचना विभागातून गहाळ झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नगररचना विभागामार्फत नियमबाहयरित्या कामे मंजूर करण्यात येणे, नियमापेक्षा जास्त बांधकाम असलेल्या कामास मंजूरी देण्याकरीता प्रभारी अधिकारी व कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यावर दबाव तंत्राचा वापर करुन कामे मंजूर करुन घेणे इत्यादी गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले असूनही प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-१०-२०२१) :** (१) माहे जून, २०२० दरम्यान अकोला महानगरपालिकेच्या नगर रचना विभागातील दोन नस्त्या गहाळ झाल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने अकोला महानगरपालिकेकडून दोन्ही प्रकरणांच्या नस्ती पुनर्गठीत करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) अकोला महानगरपालिकेच्या नगर रचना विभागातील विकास प्रस्तावांच्या दोन नस्ती ह्या माहे जून, २०२० दरम्यान श्री.किशोर मुकूंदलाल अग्रवाल यांचे बांधकाम परवानगी प्रकरण क्रं.१४/४०२/१८-१९ व श्री सुनिल कैलासचंद्र बाजोरीया यांचे जमीन अकृषी प्रकरण क्रं.अकृषी/८०/१७-१८ या मंजूर न झालेल्या नस्ती गहाळ झाल्याची बाब निदर्शनास आली.

सदर दोन्ही नस्तींचा शोध घेणे सुरु असताना त्या अभिलेखात आढळून न आल्याने दिनांक ०१/०७/२०२० रोजी नस्ती गहाळ झाल्याबाबत पोलीस तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान दोन्ही प्रकरणांच्या नस्ती पुनर्गठीत करण्यात आल्या असून त्यापैकी श्री सुनिल कैलासचंद्र बाजोरीया यांचे जमिनी अकृषी प्रकरण क्र. अकृषी/८०/१७-१८ या प्रकरणास अंतिम मंजूरी प्रदान करण्यात आली आहे व श्री.किशोर मुकूंदलाल अग्रवाल यांचे बांधकाम परवानगी प्रकरण क्रं.१४/४०२/१८-१९ या प्रकरणामध्ये कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशी, नवी मुंबई येथील खाडीमधील मासे मृत झाल्याबाबत

**(२२) ५९७२ (१२-११-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी, नवी मुंबई शहरातील नागरिक वायू प्रदुषणामुळे त्रस्त असून पाण्यातील प्रदुषणात वाढ झाल्याने खाडीतील जलप्रदुषणामुळे लाखो मासे मृत पडल्याचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या जलप्रदुषणामुळे नवी मुंबई येथील खाडीतील मासेमारी धोक्यात आली असून नवी मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा भाग असल्याने खाडीतील प्रदूषण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक कंपन्या सध्या सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता मिश्रीत पाणी जल प्रदुषणाबरोबर नवी मुंबईतील खाडीमध्ये सोडत असल्याने वाढणाऱ्या प्लास्टिक प्रदुषणामुळे देखील मच्छिमारांवर नवे संकट निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रासायनिक कंपन्यांवर कारवाई करुन मच्छिमारांसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वाशी खाडीत जलप्रषणामुळे मासे मृत झाल्याबाबतची तक्रार दूरध्वनीद्वारे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सदर परिसराची पाहणी केली असता मासे मृत झाल्याचे दिसून आले नाही.

(२), (३) व (४) ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीमध्ये २७ एमएलडी क्षमतेची प्राथमिक व व्दितीय स्वरूपाची सामुहिक सांडपाणी यंत्रणा कार्यरत असून औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांकडून सांडपाण्यावर प्राथमिक प्रक्रिया करून सदर प्रक्रियायुक्त पाणी बंदिस्त पाईपलाईनद्वारे सामुहिक सांडपाणी यंत्रणेत सोडले जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांनी बसविलेल्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची वेळोवेळी पाहणी केली जाते. पाहणीवेळी दोषी आढळलेल्या उद्योगांवर कारवाई केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी महानगरपालिकेत झालेल्या औषध गैरव्यवहाराबाबत

**(२३) ६१४९ (२०-११-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महानगरपालिकेत सन २०१५ ते २०१९ या दरम्यान झालेल्या औषध गैरव्यवहाराप्रकरणी तत्कालीन महापौरांच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ.विद्या शेट्टी यांच्यावर कारवाई करुन अहवाल पाठविण्याचे आदेश दिले असतानाही भिवंडी महानगरपालिकेने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराप्रकरणी राज्याचे राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई विभागाचे सहसंचालक यांनी आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांना पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य लेखा परिक्षकांनी चौकशी करुन गोपनीय अहवाल तत्कालीन शासनास पाठविल्यानंतर उक्त औषध गैरव्यवहार प्रकरणातील औषध खरेदीचा दस्तऐवज जळून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१)** : (१) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे तत्कालीन महापौर यांनी सदर विषयाबाबत दिनांक १७/११/२०१८ रोजी तक्रार केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्य लेखापरिक्षक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नसल्याची बाब आरोग्य सेवा आयुक्तालय यांनी कळविली आहे.

(३) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या भांडारगृहास दोनवेळा आग लागल्याचे निदर्शनास येत असून सदरची आग महानगरपालिकेच्यास्तरावर चौकशी सुरू होण्यापूर्वीची आहे असे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभिमान अंतर्गत प्राप्त निधीतून योजनेतील ९५ शहरांकरीता सोडीयम हायपोक्लोराईट सोल्युशन (२०० एमएल व ५००० एमएल) खरेदी प्रकरणी भिवंडी महानगरपालिकेने प्रत्येकी ३ लाख जार्सची मागणी केली होती. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या मागणीनुसार २०० एमएलच्या ४१८८६ बॉटल्सच्या खरेदीचे आदेश देण्यात येऊन १८,३९० बॉटल्सचा पुरवठा करण्यात आला असता तो स्विकारण्यात आला व ५००० एमएलच्या २२८८० जार्सचा पुरवठा करण्यात आला असता, तो स्विकारण्यास नकार देऊन शासनाचे आर्थिक नुकसान केल्याने डॉ.विद्या शेट्टी यांचेविरुध्द शासनाने दिनांक १०/०८/२०१७ अन्वये ज्ञापन बजावून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरू केली आहे.

तसेच शासन आदेश दिनांक ३०/०७/२०१८ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून सचिव तथा विशेष चौकशी अधिकारी(२) सामान्य प्रशासन विभाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरण चौकशी अधिकारी यांचे स्तरावर चौकशीधीन असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे. तसेच तत्कालीन, महापौर यांच्या या विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या सविस्तर अहवाल शासनास एक माहिन्याच्या आत सादर करण्याकरीता त्रयस्थ अधिकाऱ्याची नेमणूक दिनांक १८/०३/२०२१ अन्वये करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील टेक्सटाईल म्युझियमच्या कामाबाबत

**(२४) ६२०४ (१४-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या शंभर वर्षापूर्वीच्या इंडिया युनायटेड मिलच्या जागेवरील गिरण्यांच्या इमारतीपैंकी हेरिटेज दर्जा असलेल्या इमारतीचे मूळ रुपात संवर्धन केले जाणार असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये वस्त्रोद्योग आणि त्यानुषंगाने मुंबई शहराने केलेली प्रगती यांचा लेखाजोखा मांडणारा इतिहास पुढील पिढयांसाठी टेक्सटाईल म्युझियमच्या रुपात मुंबई महानगरपालिकेच्या पुरातन वास्तुजतन विभागामार्फत मांडला जाणार असून त्यामध्ये लघूपट निर्माण करुन जलपटावर प्रदर्शित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर टेक्सटाईल म्युझियमचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबतत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१०-२०२१) :** (१) सदर प्रस्ताव "मुंबई संस्कृती वारसा जतन समिती" च्या ना-हरकतीकरीता दिनांक १४/११/२०१७ रोजी सादर केला होता असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग झालेल्या मनोरंजन मैदान व वस्त्रोद्योग संग्रहालयाच्या एकूण ४४,००० चौ.मी. जागेपैकी टप्पा-१ मध्ये ७००० चौ.मी. जागेवर मुंबईतील गिरणगावाचे जीवन व गिरणीबाबत नवीन पिढीला माहिती होण्यासाठी वस्त्रोद्योगाची म्युरल्स तसेच तळ्याचे व

परिसराचे सुशोभिकरण, मल्टीमिडीया संगीत कारंजे, ध्वनी व प्रकाश व्यवस्थेमार्फत चित्रीकरणातून मुंबई व गिरणी कामगारांच्या इतिहासाचे दर्शन घडविण्यात येणार आहे.

सदर काम पूर्ण होण्यास कोविड-१९ महामारीमुळे विलंब झाला. तथापि, सदर काम दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

उर्वरित ३७,००० चौ.मी. जागेत टप्पा-२ व टप्पा-३ अंतर्भूत असून, टप्पा-२ मध्ये वस्त्रोद्योग संग्रहालय, कलादालन, विविध कला प्रदर्शनाकरीता सभागृह, ग्रंथालय, खुले प्लाझा, मनोरंजन प्लाझा, स्वागत कक्ष, सेल्फी पॉईंट इ. प्रस्तावित आहे. तसेच, टप्पा-३ मध्ये वाहनतळ, सेल्फी पॉईंट, स्वागत कक्ष प्रस्तावित आहे.

टप्पा-२ च्या अंदाजपत्रकास तसेच वस्त्रोद्योग संग्रहालयासाठी प्रदर्शित होणाऱ्या वस्तू निवडीकरीता समिती व संचालक (संग्रहालय) व अभिरक्षक नेमण्यासाठी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची माहे सप्टेंबर, २०२० मध्ये तत्वत: मंजुरी घेण्यात आली आहे. तसेच टप्पा-३ च्या आराखड्यांना मंजुरी देण्यात आली आली आहे.

त्यानुसार टप्पा-२ व टप्पा-३ साठी एकत्ररित्या निविदा प्रक्रियेचे काम सुरु असून, टप्पा-२ व ३ चे काम दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## वसई (पश्चिम) नायगांव कोळीवाडा येथील बेकरीमधून सातत्याने प्रदूषण होत असल्याबाबत

**(२५) ६४२६ (१७-०३-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १५३७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात “डेली फ्रेश” ही बेकरी अनधिकृतपणे सुरू असून सदर बेकरी बंद करण्याबाबतची लेखी तक्रार नागरिकांनी दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास

महानगरपालिकेकडे केल्यानंतर महापालिकेने सदर बेकरीस नोटीस पाठवून पुढील कारवाई सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेकडून उक्त अनधिकृत बेकरीसंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) व (२) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नायगांव कोळीवाडा येथे अनाधिकृतरित्या सुरु असलेल्या डेली फ्रेश ही बेकरी बंद करण्याबाबतची लेखी तक्रार दिनांक ०८/०१/२०२० रोजी प्राप्त झाली असल्याची वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने सदर बेकरीच्या ठिकाणी नियमानुसार स्थळ पाहणी व कागदपत्रांची छाननी केली असून दिनांक ३०/०८/२०२० रोजी बेकरी मालकास नोटीस बजावली आहे.

तथापि, बेकरी मालकाने याबाबत समाधानकारक खुलासा सादर न केल्यामुळे सदर बेकरी सीलबंद केल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२६) ६७५८ (१७-०३-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम, शीव व नायर रुग्णालयांवर येत असलेल्या रुग्णांचा ताण कमी करण्यासाठी मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच उक्त प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी किती रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे आणि उक्त निधीची तरतूद कशाप्रकारे करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयात सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याचे प्रस्तावित नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विविध महत्वपूर्ण विकास प्रकल्पांच्या कामांबाबत

**(२७) ६७६९ (१७-०३-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पातील नुकत्याच जाहीर झालेल्या १,२०५ कोटी रुपयांमधून विविध महत्वपूर्ण विकास प्रकल्पांच्या कामास मा.मुख्यमंत्री यांनी मान्यता दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे मार्च, २०२१ पर्यंत अर्धवट स्थितीत असलेले विकास प्रकल्प पूर्ण करुन महत्वपूर्ण विकास प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३) व (४) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्राधिकरण केंद्र तसेच राज्य शासनाच्या वित्तीय सहभागाच्या माध्यमातून विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर तसेच संग्रहालयाचे बांधकाम, तीर्थक्षेत्र विकास प्रकल्प, रस्ता रुंदीकरण, इतर शासकीय संस्थांची कार्यालये, वसतिगृहांची बांधकामे, इत्यादी प्रकल्पांचा समावेश आहे. सदरचे प्रकल्प अंमलबजावणीच्या विविध टप्प्यात आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत असून, त्याकरीता आवश्यक निधीकरीता संबंधित यंत्रणांकडे प्राधिकरणामार्फत पाठपुरावादेखिल करण्यात येत आहे.

---

## राज्यातील दिव्यांगाच्या पदोन्नतीचा अनुशेष भरण्याबाबत

**(२८) ६७८४ (१५-०३-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वर्ग-१ च्या १६ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिनांक १६ डिसेंबर, २०२० रोजी निर्गमित केले, परंतु दिव्यांगाच्या पदोन्नतीचा अनुशेष भरला नसल्यामुळे उक्त १६ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीला स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिव्यांगाच्या पदोन्नतीचा अनुशेष भरुन १६ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीवरील स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी दिनांक २७-०९-२०२१ रोजी मा.उच्च न्यायालयाने अंतिम निर्णय दिला असून, पदोन्नतीमध्ये दिव्यांगांना ४% आरक्षण देण्याचे आदेश दिले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेने मंत्र्यांची शासकीय निवासस्थाने थकबाकीदार घोषित केल्याबाबत

**(२९) ७४८० (१७-०३-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने मा.मुख्यमंत्री यांच्या वर्षा बंगल्यासह इतर मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानाची २४ लाख ५६ हजार ४६९ रूपयांची पाणीपट्टी थकविल्याने वर्षा बंगल्यासहीत इतर १७ बंगले थकबाकीदार म्हणून घोषित केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पाणीपट्टी थकवल्याप्रकरणी संबंधित मंत्र्याच्या बंगल्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१०-२०२१) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संगणक प्रणालीमधील तांत्रिक त्रुटींमुळे वर्षा व इतर शासकीय निवासस्थानांच्या पाणीपट्टीच्या थकबाकीची माहिती अद्ययावत झाली नव्हती.

त्यामुळे वर्षा बंगल्यासह इतर मंत्र्यांची शासकीय निवासस्थाने थकबाकीदार म्हणून घोषित झाली होती असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) वर्षा बंगला व इतर मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानांच्या जलदेयकांचे अधिदान शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाकडून राज्य शासनास विविध योजनांसाठी मिळणारा निधी प्रलंबित असल्याबाबत

**(३०) ८४२२ (२२-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राज्याला माहे जानेवारी, २०२१ पर्यंत विविध योजनांचा रुपये ९६ हजार ९८७ कोटी ५४ लाखांचा निधी दिला नसून त्यात माहे फेब्रुवारी व मार्च, २०२१ पर्यंतचा निधी विचारात घेता रुपये १ लाख कोटीचा निधी केंद्र शासनाकडून राज्य शासनास मिळणे बाकी असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून राज्य शासनास किती व कोणत्या कालावधीपासूनचा निधी प्राप्त व्हावयाचा आहे व त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, राज्यावर आलेले कोरोनाचे संकट, कमी झालेले उत्पन्नाचे मार्ग, आस्थापनेवरील खर्चात झालेली तफावत, राज्यावरील कर्जाचा बोजा रुपये ६ लाख १५ हजार कोटींवर जाण्याचा वर्तविलेला अंदाज व ठप्प झालेली विकास कामे इत्यादींसाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक असल्याने केंद्र शासनाकडे थकीत असलेला निधी राज्य शासनास मिळावा याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२८-१०-२०२१) :** (१) सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात केंद्र शासनाकडून राज्य शासनास विविध योजनांसाठी माहे एप्रिल, २०२० ते जानेवारी,२०२१ पर्यंत रुपये १२७७९.४७ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.माहे फेब्रुवारी व मार्च,२०२१ पर्यंत रुपये ४९५५.१८ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे तर दिनांक १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च, २०२१ पर्यंत एकूण रुपये १७७३४.६५ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

(२) अर्थसंकल्पीय अंदाजानुसार केंद्र शासनाकडून राज्य शासनास सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात केंद्रीय करातील राज्याच्या हिश्श्यापोटी रुपये ४८,१०९.४९ कोटी तसेच केंद्र शासनाकडून राज्यास केंद्रीय सहायक अनुदानापोटी (यामध्ये वस्तू व सेवा कर भरपाई, केंद्रीय पुरस्कृत योजना, वित्त आयोगाने निर्धारित केलेला निधी तसेच राष्ट्रीय व राज्य आपत्तीय प्रतिसाद निधी इ. चा समावेश आहे) रुपये ५३,७७०.०३ कोटी इतकी रक्कम अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने महालेखापालांच्या सन २०२०-२१ (पुरवणी-२) नागरी लेख्यानुसार केंद्रीय करातील हिश्श्यापोटी रुपये ३६,४७९.५५ कोटी तर केंद्रीय सहायक अनुदानापोटी रुपये ५२,७२८.५६ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.

(३) व (४) वित्त विभागाने जी.एस.टी. भरपाईपोटी केंद्र शासनाकडे सन २०२०-२१ मध्ये दावा केलेली एकूण रक्कम रुपये ६७,१३१ कोटी असून त्यापैकी रुपये ५६,३५४ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे व रुपये १०,७७७ कोटी इतकी रक्कम येणे शिल्लक होते. केंद्र शासनाकडून प्राप्त निधीपैकी राज्य व वस्तु सेवा कराच्या नुकसान भरपाई व केंद्रीय करातील राज्याचा हिस्सा या बाबीच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून अप्राप्त निधी मिळणेबाबत मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३० मार्च, २०२० व १७ एप्रिल, २०२० च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती केली आहे.

---

## विविध विभागांतर्गत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सरळ सेवा भरतीबाबत

**(३१) ८४२८ (१५-०७-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेश कराड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागांतर्गत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची सरळ सेवा भरती करण्याची सामान्य प्रशासन विभागाचे आदेश तसेच राज्य मंत्रिमंडळाची संमती असतानाही वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागात गैरमार्गाने कंत्राटी व बाहय स्त्रोतांद्वारे भरती केली जात असल्याची तक्रार राज्य शासकीय गट “ड” (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाने लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या संचालकांनी दिनांक ११ जून, २०२० च्या शासन निर्णयाचा संदर्भ देत संघटनेला लिहिलेल्या पत्रात कुशल व अकुशल संवर्गातील भरती सरळ सेवा पध्दतीने करण्याचे स्पष्ट आश्वासन दिले असून देखील गैरमार्गाने कंत्राटी व बाह्य स्रोत मार्गाद्वारे ही भरती सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना काळात तातडी म्हणून सार्वजनिक आरोग्य विभागातील चतुर्थ श्रेणीची १० हजार १२७ रिक्त पदे भरण्याचे निश्चित करण्यात आले असून यापैकी सार्वजनिक आरोग्य विभागाने सरळ सेवा भरतीबाबत सकारात्मक भूमिका घेतली असली तरी वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग विरोधी भूमिका घेत असल्याचा आरोप महासंघाने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२१-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेंतर्गत उद्यानबंदी केल्यामुळे ग्रीन जीमकडे दुर्लक्ष झाल्याबाबत

**(३२) ८५७१ (१५-०७-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेंतर्गत कोरोना संसर्ग रोखण्यासाठी उद्यानबंदी केल्यामुळे ग्रीन जीमकडे दुर्लक्ष झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेच्या ५४ व नागपूर सूधार प्रन्यासाचे ५३ उद्यानामध्ये लोकप्रतिनिधीच्या निधीतुन जनतेसाठी व्यायामाचे साहित्य बसवून सौदर्यीकरण करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रीन जीम आणि उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीकडे महानगरपालिकेच्या कंत्राटदारांनी दुर्लक्ष केल्यामुळे उद्यानाची दुरवस्था झाली असून उद्यानात ठेवलेले सुरक्षारक्षक ही अनुपस्थित असल्यामुळे उद्यानातील काही भागात समाज कंटकाचा वावर देखील वाढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागपूर शहरातील ग्रीन जीम आणि उद्यानाची देखभाल दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-१०-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर उद्याने बंद असल्याने काही सुरक्षा रक्षकांना कोविड विलगीकरण केंद्रावर गर्दी व्यवस्थापनाच्या अनुषंगाने तैनात करण्यात आले होते. त्यामुळे काही उद्यानात सुरक्षा रक्षक नव्हते. तथापि, त्यामुळे उद्यानातील काही भागात समाजकंटकांचा वावर वाढल्याची बाब खरी नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक धोरणासाठी अभ्यासगट तयार करण्याबाबत

**(३३) ८६१६ (२०-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक समाजाचे शैक्षणिक धोरण निश्चित करुन अभ्यासगट तयार करण्यासाठी दिनांक ६ मे, २०१७ रोजी तयार करण्यात आलेल्या शासन निर्णयाची अद्यापपर्यंत कोणतीही अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शासन निर्णयाप्रमाणे सदर अभ्यासगट तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१०-२०२१) :** (१) खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (डी.सी.पी.एस.) खात्याच्या आर्थिक अनियमिततेबाबत

**(३४) ८८०३ (१५-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाजगी अनुदानित प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/अध्यापक विद्यालयातील १०० टक्के अनुदानित पदावरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या घटनाबाह्य शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संचालक (प्राथ.) व संचालक (माध्य.) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांना उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंमलबजावणीसाठी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार खात्याचा व्यवहार करण्यात आला नसून खात्यावर खातेधारकाने जमा केलेल्या अंशदान राशीचा व शासनाने जमा केलेल्या अंशदान राशीचा हिशोब आजपर्यंत खातेधारकांना देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक २८/१२/२०२०, २३/०१/२०२१ व दिनांक ०३/०४/२०२१ रोजी पत्र पाठवून दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० रोजीचा शासन निर्णय रद्द करून खातेधारकांना तात्काळ हिशोब देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-१०-२०२१) :** (१) व (२) वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयान्वये राज्यात परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली असून ही योजना अनुदानित शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २९/११/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहीत केली आहे. ज्या शाळा दिनांक ०१/११/२००५ नंतर १००% अनुदानावर आलेल्या आहेत, अशा शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू आहे. सदर शासन निर्णयानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक हे उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी म्हणून काम पाहतील अशी तरतूद आहे.
(३) सदर खात्यातील जमा रकमेचा हिशोब देण्याबाबत सर्व संबंधित क्षेत्रिय कार्यालयांना शिक्षण संचालक यांनी दिनांक १५/०२/२०२१ रोजी सूचना दिल्या असून याअनुषंगाने क्षेत्रिय स्तरावरुन कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.
(४) मा.लोकप्रतिनिधींचे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना खात्याचा हिशोब खातेधारकाला तात्काळ देण्याबाबत दिनांक २८/१२/२०२० चे निवेदन प्राप्त झाले आहे.
(५) व (६) शिक्षण संचालक यांनी दिनांक १५/०२/२०२१ अन्वये सूचना दिल्या असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) ८९४४ (१५-०७-२०२१) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सिमेंट बंधारे, ओढा व नाला सरळीकरण, बांध बंदिस्तीकरण व पाझर तलाव दुरुस्ती इत्यादी कामे जलसंधारण विभागामार्फत करण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन शासनाने राबविलेली जलयुक्त शिवार योजना बंद केल्याने व नवीन योजना न आखल्यामुळे जिल्ह्यातील सर्व जलसंधारणाची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांना शासनाने जाणीवपूर्वक निधी उपलब्ध करून दिला नसल्याने निधी अभावी कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील जनहिताच्यादृष्टीने अत्यंत महत्वाची असणारी जलसंधारणाची कामे पूर्ण करण्याकरीता आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१०-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान ही योजना २०१९ मध्ये संपलेली असून सद्य:स्थितीमध्ये मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत व जिल्हा नियोजन समिती अंतर्गत कामांना मान्यता दिली जात आहे.

(३) हे खरे नाही.

प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांना टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील इंग्रजी माध्यम शाळेत शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण रोखल्याबाबत

**(३६) ८९७८ (२०-०७-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इंग्रजी माध्यम शाळेत शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबविले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशी, नवी मुंबई येथील सेंट लोरेन्स शाळेत १० वीच्या विद्यार्थ्यांनी शुल्क न भरल्याने त्यांना फॉर्म भरण्यास परवानगी नाकारल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील अपात्र आणि बनावट शिधापत्रिकांची विशेष शोध मोहिम राबविण्याबाबत

**(३७) ९०६२ (१५-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर जिल्हयात अपात्र आणि बनावट शिधापत्रिकांचा शोध घेण्यासाठी शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्यावतीने राबविण्यात आलेल्या विशेष शोध मोहिमेच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हयात दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२१ ते दिनांक ३० मार्च, २०२१ या कालावधीत कोणत्याच प्रकारची शोध मोहिम राबविण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित स्थानिक प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी अपात्र व बनावट शिधापत्रिकाधारक शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेत असल्यामुळे गरजू व पात्र लाभार्थ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सोलापूर जिल्ह्यात अपात्र आणि बनावट शिधापत्रिकांची विशेष शोध मोहिम राबविण्याकरीता कार्यवाही करुन शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर शोधमोहिम योजना कधी पूर्ण करण्यात येईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१३-१०-२०२१)** : (१), (२) व (३) सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, २०१५ मधील तरतुदीनुसार शिधापत्रिका तपासणी ही निरंतर प्रक्रिया आहे. राज्याची ७००.१६ लक्ष लाभार्थी संख्या शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये पूर्ण झाल्यावर नविन लाभार्थी समाविष्ट करणे शक्य होणार नसल्यामुळे अपात्र शिधापत्रिका मोहिम राबवून अपात्र, दुबार, स्थलांतरीत, मयत लाभार्थ्यांना प्राथम्याने वगळण्याची कार्यवाही करण्याबाबत व अपात्र शिधापत्रिकाचा शोध घेऊन अशा शिधापत्रिका रद्द करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना शासन परिपत्रक दिनांक २८/०१/२०२१ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर व जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांचे अधिनस्त कार्यालयाकडून सदर मोहिम राबविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत होती.

तथापि, राज्यातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव, मनुष्यबळाचा अभाव इ. बाबी विचारात घेता अपात्र शिधापत्रिका मोहिमेला पुढील आदेशापर्यंत शासन परिपत्रक दिनांक ०१/०४/२०२१ अन्वये स्थगिती देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांना कायमस्वरूपी नियुक्त्या देण्याबाबत

**(३८) ९०९३ (१०-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ६३५४ ला दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करुन त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्याबाबत राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी २४ तास काम बंद आंदोलन केले असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तात्पुरत्या सेवा नियमित करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालयांनी विविध प्रकरणात पारित केलेल्या न्यायनिर्णयानुसार प्रस्थापित झालेल्या वैधानिक निर्बंधामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्यासंदर्भातील अडचणी दूर करण्यात आल्या आहेत काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२८-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत सामान्य प्रशासन विभाग व विधी व न्याय विभागाशी सल्लामसलत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोनामुळे अनाथ झालेल्या मुलांच्या पुढील आयुष्याबाबत योजना आखून त्यांचे आर्थिक व शैक्षणिक प्रश्न सोडविण्याबाबत

**(३९) ९१०३ (१०-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाने आई-वडीलांचा मृत्यू झाल्यामुळे अनेक लहान मुले अनाथ होऊन त्यांना आर्थिक व शैक्षणिक अडचण निर्माण झाल्याचे तसेच, त्यांना बेकायदेशीरपणे दत्तक घेणे किंवा त्यांची विक्री करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनाथ झालेल्या मुलांना बेकायदेशीरपणे दत्तक घेणे किंवा त्यांची विक्री करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन अनाथ मुलांच्या पुढील आयुष्याबाबत योजना आखून त्यांचे आर्थिक व शैक्षणिक प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, केलेल्या कार्यवाहीचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२२-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) माहे मे, २०२१ मध्ये, अनाथ मुलांच्या दत्तकविधान प्रक्रियेबाबत समाज माध्यमातून चुकीची माहिती पसरविण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे याविषयी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत सायबर गुन्हे अन्वेषण विभागास कळविण्यात आले आहे.

महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ २०२१/प्र.क्र. ४९/का.०३ दिनांक १७/०६/२०२१ अन्वये, कोविड-१९ संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या अनाथ बालकांच्या नावे रुपये ५ लक्ष इतक्या रकमेची मुदत ठेवीच्या स्वरुपात अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. तसेच या बालकांना बालसंगोपन योजनेंतर्गत दरमहा रुपये ११००/- इतके अर्थ सहाय्य उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कोविड-१९ संसर्गामुळे दोन्ही पालकांचा मृत्यू झालेला आहे अशा बालकांना शैक्षणिक शुल्काची रक्कम उपलब्ध करण्यासाठी प्रोजेक्ट मुंबई या स्वयंसेवी संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याचे नवीन सांस्कृतिक धोरण ठरविण्याबाबत

**(४०) ९२६७ (१५-०७-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सन २०१० मध्ये जाहीर केलेल्या सांस्कृतिक धोरणात व्यापक बदल करण्यात येवून त्याऐवजी नवीन सांस्कृतिक धोरण जाहीर करण्यात येईल” असे मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी दिनांक १५ मार्च, २०२१ रोजी जाहीर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरण ठरविण्यासाठी राज्यस्तरावर समिती नियुक्त करुन कालबध्द कार्यक्रमांतर्गत या समितीने शासनास शिफारशी अहवाल सादर करावा असेही मा.सांस्कृतिक कार्य मंत्री महोदयांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने समिती स्थापन केली आहे काय व कधी, तसेच समितीची कार्यकक्षा व अहवाल सादर करण्याबाबतचा कालावधी याबाबत कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२५-१०-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) समिती गठनाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील लहान, मोठे व मध्यम प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती व साठवण क्षमतेच्या उपाययोजनेबाबत

**(४१) ९३०६ (१५-०७-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी, माजलगाव, केज, बीड, पाटोदा, आष्टी, शिरुर (कासार), धारुर व वडवणी (जि.बीड) या तालुक्यांमध्ये सन १९६६ ते १९८८ पर्यंत लहान, मध्यम व मोठे प्रकल्प तयार केले असून या प्रकल्पातून गाळ काढणे व साठवण क्षमतेचे व्यवस्थापन केले गेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृष्णा व मराठवाडा सिंचन प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पातून गाळ काढणे व साठवण क्षमतेचे व्यवस्थापन करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व याबाबत परिपत्रके काढण्यात आली आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२१-१०-२०२१) :** (१) खरे नाही. प्रकल्पातून गाळ काढणेसाठी लोकसहभागातून कामकाज करण्यात येते. शिवाय यांत्रिकी मशीनरी लाऊन काही ठिकाणी गाळ काढण्यात आला आहे.

(२) कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३ या योजनेचे काम बीड जिल्ह्यात आहे. या योजनेव्दारे प्रथम टप्यात उपलब्ध होणाऱ्या १.६८ अ. घ. फु. पाण्यातुन ८१४७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या योजनेतील खुंटेफळ साठवण तलावाचे काम ४२% पूर्ण झाले आहे. योजनेच्या इतर टप्यातील कामे सर्वेक्षण व संकल्पनाच्या स्तरावर आहेत.

(३) धरणातील गाळ काढण्यासाठी स्वामीत्व शुल्कात सूट दिलेले असल्याने शेतकरी स्वखर्चाने गाळ काढून शेतात टाकू शकतात तसेच जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. मेरीना-२०१८/ (१३७/२०१८) /लाक्षेवि (आस्था), दिनांक ०३/०८/२०१८ नुसार राज्यातील पाच मोठ्या पाटबंधारे प्रकल्पामध्ये गाळ

मिश्रीत रेती व रेती निष्कासनाची कार्यवाही प्रायोगिक तत्वावर करण्यात येणार आहे. त्यातील अनुभवाचा विचार करुन राज्यातील उर्वरीत प्रकल्पाबाबत गाळ मिश्रीत वाळू/रेतीच्या निष्कासनाबाबतचे पुढील कार्यवाहीचे नियोजन करण्यात येईल.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षणाधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(४२) ९३५२ (२०-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ३३ जिल्हा परिषदा व ४ महापालिकांमधील शिक्षणाधिकाऱ्यांच्या १४४ पदांपैकी ६१ पदे रिक्त असल्याचे दिनांक २३/४/२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजना बाधित होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२२-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ नये अथवा विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजना बाधित होऊ नये म्हणून रिक्त पदांचा कार्यभार प्रभारी अधिकाऱ्यांकडून पार पाडण्यात येत आहे.
(३) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील लोक कलावंत व तमाशा कलावंतांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत

**(४३) ९४६९ (१८-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनामुळे मागील दीड वर्षापासून सांस्कृतिक कार्यक्रम बंद असल्यामुळे लोक कलावंतांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने तसेच, यात्रा-जत्रांमधील तमाशा बंद असल्यामुळे फड मालक कर्जबाजारी झाले असून तमाशा कलावंत व लोक कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कलावंतांना आर्थिक सहाय्य करण्याचे आश्वासन मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात राज्यातील कलावंतांच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींच्या समवेत आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन बैठकीत संवाद साधतांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लोक कलावंतांना आर्थिक सहाय्य व तमाशा कलावंतांना फड उभे करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२५-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२०/प्र.क्र. २२४/सां.का.४, दिनांक ५ नोव्हेंबर, २०२० अन्वये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर “मिशन बिगीन अगेन” अंतर्गत बंदिस्त सभागृहे/ मोकळया जागेत होणारे इतर सांस्कृतिक कार्यक्रम पुन्हा सुरु करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे अंतर्गत सर्व कलाकारांना विविध अटी व शर्तींच्या अधिन राहून कार्यक्रम करण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र

कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढल्याने हे कार्यक्रम बंद करण्यात आले होते. आता ते पुन्हा दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ पासून काही अटींवर सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

सदर बैठकीत शासन आर्थिक सहाय्याबाबत सकारात्मक असल्याचे मा.मंत्री महोदयांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार राज्यातील प्रयोगात्मक कलांवर चरितार्थ अवलंबून असणाऱ्या ५६,००० कलावंतांना प्रत्येकी रुपये ५,०००/- व ८४७ प्रयोगात्मक कलासंस्थांना एकूण ६.०० कोटी अर्थसहाय्य करण्याचा निर्णय नुकताच मंत्रिमंडळाने घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहतीमधील ग्रामपंचायत कराची वसूली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्याबाबत

**(४४) ९४७५ (०९-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील मिळकतीवरील कराची वसूली ग्रामपंचायतीच्यावतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्याबाबत शासन निर्णय झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासन निर्णयाच्या धर्तीवर सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहतीमधील ग्रामपंचायत कराची वसूली शेजारील महाराष्ट्र विकास महामंडळाकडून करण्याबाबत सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्या. सिन्नर यांनी प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील मिळकतीवरील कराची वसूली ग्रामपंचायतीच्यावतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२६-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सिन्नर तालुका औद्योगिक वसाहतीमधील ग्रामपंचायत कराची वसुली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्याबाबत महामंडळास प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित हे औद्योगिक क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीत येत नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(४५) ९४८० (१५-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.कपिल पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी नवीन अंशदान पेन्शन योजना लागू केली तसेच दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शिक्षकांना सदरहू नवीन अंशदान पेन्शन योजना लागू केली परंतु सदरहू विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षकांना जुनी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यासाठी शासनस्तरावर नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सन २००५ रोजीच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना मंजूर करणेबाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना सातत्याने मागणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १० जुलै, २०१९ रोजीची अधिसूचना रद्द केल्यामुळे दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कोणतीही अडचण नसून शिक्षण विभागाने दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे अद्यापी सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना बंद करण्याच्या अधिसूचनेची पुर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी केली असून सदर अधिसूचनेमध्ये स्थायी कर्मचारी (वेतनश्रेणीवरील) शिक्षकांना जूनी पेन्शन योजना लागू राहील, अशी तरतूद असल्यामुळे अंशत: अनुदानित व विनाअनुदानित शिक्षक हे वेतनश्रेणीवरील असल्यामुळे ते जुन्या पेन्शन योजनेला पात्र ठरतात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंशत: अनुदानित शिक्षकांना तसेच दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीचे स्थायी (अंशत: अनुदानित/विनाअनुदानित) शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-१०-२०२१) :** (१) राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयात दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू होते. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडे दिनांक २६/०६/२०२० रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार दिनांक २४ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दिनांक ०३ जुलै, २०२० रोजी शासनास अहवाल सादर केला आहे.

(२) याबाबत संघटनांकडून मागणी करण्यात येते.

(३), (४) व (५) वित्त विभागाने दिनांक ३१/१०/२००५ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू केली आहे. मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयात दिनांक ०१/११/२००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अशंदान निवृत्तीवेतन योजनेची कार्यपध्दती शासन निर्णय, शा.शि.व क्री.वि., दिनांक २९/११/२०१० अन्वये विहित केली आहे. तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ च्या नियम १९ मध्ये सुधारणेबाबत हरकती व सूचनासंदर्भात दिनांक १०/०७/२०२० ची अधिसूचना प्रसिध्द केली होती. सदर अधिसूचना दिनांक ११/१२/२०२० अन्वये मागे घेतली असल्याने नियम १९ मध्ये सुधारणा झालेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## भोळवली (ता.मंडणगड, जि रत्नागिरी) येथे बांधलेल्या धरणातील पाण्याचा शेतकऱ्यांना उपयोग होत नसल्याबाबत

**(४६) ९५८४ (१७-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोळवली (ता.मंडणगड, जि रत्नागिरी) येथे रुपये १६ कोटी १८ लाखांपेक्षा अधिक रक्कम खर्च करून बांधलेल्या धरणातील पाण्याचा शेतकऱ्यांना उपयोग होत नसून सदरहू धरणाच्या भिंतीची एका बाजूकडील दगडी पिंचिग पूर्णत: ढासळली असून पिचिंगचे काम पुन्हा करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाच्या बांधकामास माहे मार्च, १९९६ मध्ये सुरूवात करण्यात आली असून या बांधलेल्या धरणातील जलसाठ्याची एकूण क्षमता ५.६१८ दलघमी आहे, धरणाच्या पाण्याखाली बुडीत क्षेत्र ४५ हेक्टर आहे तर धरणाच्या पाण्याने ओलीताखाली येणारे अपेक्षित सिंचन क्षेत्र हे ३३० हेक्टर गृहीत धरण्यात आलेले आहे शिवाय धरणात मुबलक पाणीसाठा असूनही

शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करण्यात येत नसल्याने नेमके हे धरण कुणासाठी आणि कशासाठी बांधले आहे असा प्रश्न शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू धरण बांधून १० वर्षांहून अधिक कालावधी होऊनही सिंचनासाठी शेतकऱ्यांना एकही थेंब न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली आहे तसेच, पाण्याने ओलीताखाली येणाऱ्या अपेक्षित सिंचन क्षेत्राला (३३० हेक्टर) विनाविलंब पाणी मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२५-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
भोळवली ल. पा. प्रकल्पास सन १९९४ मध्ये रुपये ५.६८ कोटी किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून सन २००३ मध्ये रुपये १६.१८ कोटी किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

धरणाच्या उर्ध्व बाजूकडील पिचिंग ढासळलेले नसून निविदेपेक्षा/सु.प्र.मा.पेक्षा जास्त खर्च झाल्याने उर्वरीत अश्मपटलाचे काम अपूर्ण आहे. सद्य:स्थितीत धरणाचे अपूर्ण पिचिंगचे कामाचे कार्यारंभ आदेश दिले असून मे-२०२२ अखेर अपूर्ण काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सन १९९५-९६ मध्ये धरणाच्या बांधकामास सुरूवात होऊन सन २००१ मध्ये प्रकल्पाची घळभरणी होऊन सांडवा बार वगळता धरणाचे काम पूर्ण झालेले असून प्रकल्पीय ५.६१८ द.ल.घ.मी. पैकी ४.६२८ द.ल.घ.मी.(८२%) पाणीसाठा निर्माण झाला आहे. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र ४५ हेक्टर आहे. तसेच प्रकल्पिय सिंचन क्षेत्र ३३० हे.(१००%) घोषित केले आहे. प्रकल्पांतर्गत डावा कालवा ७.६२ कि.मी. लांबीचा असून सन २००४-०५ नंतर ६ कि.मी. पर्यंत कालवा बांधकाम झाले आहे. उर्वरित १.५ कि.मी. लांबीतील कामे भूसंपादना अभावी अपूर्ण आहेत.

सन २००७ मध्ये कालव्याची चाचणी घेण्यासाठी कालव्यामध्ये पाणी सोडण्यात आले असता कालवा विनाअस्तरीकरण असल्याने त्यामधून मोठ्या प्रमाणात पाझर होऊन कालव्याच्या आजुबाजुच्या क्षेत्रात दलदल सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने तसेच त्यानंतर सिंचनासाठी पाण्याची मागणी होत नसल्याने अद्यापपर्यंत कालव्यातून पाणी सोडण्यात आले नाही.

(३) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून सिंचनासाठी पाण्याची मागणी होत नसल्याने बऱ्याच कालावधीत कालव्यामध्ये पाणी सोडण्यात आलेले नाही.

(४) सिंचनासाठी पाण्याची मागणी होत नसल्याने बऱ्याच कालावधीत कालव्यामध्ये पाणी सोडण्यात आलेले नसल्याने कालव्याचा वापर होत नाही. तसेच डोंगर उतारावरून कालव्यात ढासळणाऱ्या मातीमुळे कालवा गाळाने भरला असून नादुरूस्त झाला आहे. सबब चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. सद्य:स्थितीत रत्नागिरी पाटबंधारे विभाग, रत्नागिरी या विभागाकडून सन २०२०-२१ च्या बिगर सिंचन प्रापणसूची मधून प्राध्यान्याने धरण सुरक्षा व गळती प्रतिबंधक काम मंजूर असून मे, २०२२ पुर्वी पूर्ण करणेत येत आहे. तद्नंतर सिंचनासाठी पाण्याची मागणी झाल्यास व निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील वर्षी प्रापणसुचीमध्ये कालवा पुनर्स्थापना कामे प्रस्तावित करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विभागातील बालगृहातील निवृत्त कर्मचाऱ्यांची उपदान निधी (ग्रॅज्युईटी) मिळणे तसेच संस्थेमध्ये पूर्णवेळ मुख्याधिकारी नेमणेबाबत

**(४७) ९६०९ (१७-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या “दि चिल्ड्रेन्स एड” या प्राधिकृत संस्थेमार्फत मुंबई विभागात डोंगरी, मांटुगा व मानखुर्द येथील बालगृहांचे संचालन महिला व बालविकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षापूर्वी “दि चिल्ड्रेन्स एड” या संस्थेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांचा उपदान निधी (ग्रॅज्युईटी) अद्‌याप मिळाला नसल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आगामी आठ दिवसात कार्यवाही न झाल्यास कर्मचारी संघटनेने त्या विरोधात आंदोलन करण्याबाबत शासनास विनंती वजा नोटीस दिली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त संस्थेस पूर्णवेळ मुख्याधिकारी नसल्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या निर्माण होत असल्याने सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)(२१-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

तथापि, संस्थेकडून माहे एप्रिल, २०२१ मध्ये म्हणजे उशिराने प्रस्ताव प्राप्त झाल्यामुळे उपदान निधी अदा करता येवू शकला नाही.

(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई या संस्थेस महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक १६ एप्रिल, २०१९ अन्वये श्री.विजय क्षीरसागर यांची मुख्य अधिकारी या पदावर पूर्णवेळ नियुक्ती करण्यात आली असून दिनांक १६ एप्रिल, २०१९ पासून श्री.विजय क्षीरसागर हे संस्थेचे मुख्य अधिकारी म्हणून पूर्णवेळ कामकाज पाहत आहेत. त्यामुळे दि चिल्ड्रेन्स एड सोसायटीच्या कामकाजावर पूर्णवेळ मुख्य अधिकारी नसल्याने निवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या निर्माण होत आहेत, असे म्हणणे संयुक्तीक नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील विंधण विहिरीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४८) ९९७७ (१५-०७-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात मोठ्या प्रमाणत विंधण विहिरीतील पाणी दूषित झाल्यामुळे वाडीतील ग्रामस्थांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विंधण विहिरीत झाडेझुडपे, साचलेला गाळ, झाडांचा पालापाचोळा पडून जलस्त्रोत बंद होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विहिरीत शेवाळ झाले असून ग्रामस्थांना दूषित व शेवाळयुक्त पाणी पिण्यास लागत असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विंधण विहिरीची स्वच्छता, देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१२-१०-२०२१) :** (१) व (२) माहे मे, २०२१ मध्ये शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या ३७५ नमुन्यांची जैविक तपासणी व ५३ पाणी नमुन्यांची रासायनिक तपासणी केली असता १ विंधण विहिरीचा नमुना जैविकदृष्टया पिण्यास अयोग्य आढळून आला असून रासायनिक तपासणी दरम्यान एकही नमुना पिण्यास अयोग्य आढळून आलेला नाही.

जैविकदृष्टया पिण्यास अयोग्य आढळून आलेल्या चौंढे ग्रामपंचायतीतील विंधण विहिरीचा पाणी नमुना ग्रामपंचायतीमार्फत उपाययोजना केल्यानंतर माहे जून, २०२१ मध्ये फेरतपासणी केली असता पिण्यास योग्य आढळून आला आहे. यामुळे शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात मोठ्या प्रमाणात विंधण विहिरीतील पाणी दूषित झाल्याने ग्रामस्थांना पाणी टंचाईस सामोरे जावे लागते अशी बाब नाही.

(३) व (४) शहापुर (जि.ठाणे) तालुक्यातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची जैविक व रासायनिक तपासणी केल्यानंतर पिण्यास अयोग्य आढळून आलेल्या पाणी स्त्रोतांचे निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे व सदर स्त्रोतांची फेरतपासणी केली असता स्त्रोतांचे पाणी नमुने पिण्यास योग्य आढळून आले आहेत.

शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) विंधण विहिरीची दुरूस्ती ही पंचायत समिती मार्फत हातपंप दुरूस्ती पथकाकडून वेळोवेळी करण्यात येते. तसेच ज्या विंधण विहिरीमध्ये झाडाची मुळे अथवा गाळ साचला आहे त्या ठिकाणी भूजल सर्वेक्षण, जिल्हा परिषद ठाणे मार्फत विंधण यंत्राद्वारे फ्लशिंग करून नविन हातपंप व कट्टा बांधणीची कामे करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जल जीवन अभियान योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागामधील प्रत्येक घरापर्यंत नळ योजना सुरु करण्याबाबत

**(४९) १००४७ (२०-०७-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ‘जल जीवन अभियान’ योजनेच्या माध्यमातून सन २०२४ पर्यंत देशातील ग्रामीण भागामधील प्रत्येक घरापर्यंत नळ योजना सुरु करण्याचे लक्ष मा.प्रधानमंत्री यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ रोजी निश्चित केल्यामुळे जल गुणवत्तेचे निरीक्षण आणखी सशक्त करण्याच्या उद्देशाने प्रत्येक गावातून स्थानिक सदस्यांची निवड करून पाणी समिती स्थापन करणे व त्यांना प्रशिक्षण देण्याचे निर्देश राज्य व केंद्र शासित प्रदेशांना देण्यात आले असून सर्व गावांमधील प्रत्येक घरात व सार्वजनिक संस्थांमध्ये पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करण्यासाठी जल गुणवत्तेची पाहणी व निरीक्षणासंदर्भातील (डब्लूक्यूएम अ‍ॅण्ड एस) कार्य सुरू करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक राज्यात व केंद्र शासित प्रदेशामध्ये किमान एक प्रयोगशाळा तसेच मोठ्या राज्यांमध्ये व केंद्र शासित प्रदेशामध्ये पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी विभागीय प्रयोगशाळा स्थापन करण्यास सांगण्यात आले असून, पाण्याच्या गुणवत्तेचे निरीक्षण करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीत किमान १० ते १५ सदस्य असावेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील एकूण गावांपैकी आजमितीस किती गावांमध्ये पाणी समितीची स्थापना तसेच अन्य सूचनांचे पालन करण्यात आले आहे व अद्यापी किती गावांमध्ये पाणी समिती स्थापना तसेच अन्य सूचनांचे पालन करण्यात आले नाही,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित गावांमध्ये विनाविलंब पाणी समित्यांची स्थापना तसेच अन्य सूचनांचे काटेकोरपणे पालन होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०६-१०-२०२१) :** (१) केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांअंतर्गत गावातील पाणी पुरवठ्याच्या व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडण्यासाठी ग्रामसभेमार्फत ग्रामपंचायत किंवा तिच्या उपसमित्या जसे ग्राम पाणी व स्वच्छता समिती/ पाणी वापर संस्था / पाणी समिती इ. यांची निवड करण्याची व त्यांच्यामार्फत पाण्याची गुणवत्ता तपासणे व स्वच्छता विषयक तपासणीकरीता ग्रामीण युवक / विद्यार्थी / महिलांना प्रशिक्षण देण्याबाबत सूचना आहेत. तसेच प्रत्येक घरात व सार्वजनिक संस्थामध्ये गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने जलजीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण (WQM & S) हा घटक कार्यक्रम/उपक्रम राबविण्यात येत आहे.
(२) केंद्र शासन पुरस्कृत जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत राज्य, उपविभाग, तालुका, फिरत्या स्तरावरील पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा उभारणे/ अद्यावत करणे/ बळकटीकरण करणेबाबत सूचना नमूद आहेत. राज्यात पाणी गुणवत्ता तपासणीकरीता सध्या १ राज्यस्तरीय, ६ विभागीय प्रयोगशाळा, २८ जिल्हा

प्रयोगशाळा तसेच १४८ उपविभागीय प्रयोगशाळा कार्यरत आहेत. तसेच गावात पाणीपुरवठा व्यवस्थापनासाठी निवडलेल्या उपसमिती जसे ग्राम पाणी व स्वच्छता समिती /पाणी वापर संस्था / पाणी समिती इ. मध्ये ग्रामपंचायतीमधून निवडून दिलेले १० ते १५ सदस्य सभासद असावेत, त्यात ५०% महिला सदस्य असाव्यात आणि उर्वरित २५% अनुसूचित जाती/जमातीचे प्रतिनिधी लोकसंख्येच्या प्रमाणात असावेत तसेच, प्रत्येक ग्रामपंचायत किंवा तिची उपसमिती यांनी प्रत्येक गावातील ५ महिलांची निवड करून, त्यांना पाणी गुणवत्ता विषयासंबंधी प्रशिक्षण देणे व या प्रशिक्षित महिलांच्या माध्यमातून गावामध्ये पाणी गुणवत्ता सर्वेक्षणाचे काम करण्याबाबत मार्गदर्शक सूचना आहेत.

(३) राज्यामधील सर्व २७,८६२ ग्रामपंचायतींमध्ये ग्राम पाणी व स्वच्छता समिती स्थापन झाल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग व मुरुड (जि.रायगड) येथे समुद्र किनाऱ्यालगतची अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(५०) ४५८२७ (३०-११-२०१८) श्री.जयंत पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३९२२२ ला दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग व मुरुड (जि.रायगड) येथे समुद्र किनाऱ्याच्या परिसरात सागरी नियमन क्षेत्र कायद्याचे उल्लंघन करून तसेच स्थानिक ग्रामपंचायतीच्या सहभागाने अनेक गर्भश्रीमंत उद्योगपती, व्यापारी आदींनी सुमारे २०२ हून अधिक अनधिकृत बंगले व अन्य स्वरूपाचे बांधकाम केले असून या सर्वांना पर्यावरण सौरक्षक अधिनियम कलम १९ नुसार नोटीसा देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच नियमांचे उल्लंघन करून सदरहू ठिकाणी बांधण्यात आलेल्या या अनधिकृत बंगल्यांविरुध्द कारवाई करण्याचा निर्णय मा.पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समुद्र किनाऱ्यावर बेकायदेशीर बंगले बांधणाऱ्यांविरोधात कलम १५ अन्वये १६४ गुन्हांची नोंदही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अलिबाग व मुरुड किनाऱ्यावर आजमितीस एकूण किती अनधिकृत बंगले आहेत, यातील प्रमुख व प्रशस्त बंगल्याचा तपशील काय आहे, तसेच कोणकोणत्या व्यक्तींचे बंगले/अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (१२-१०-२०२१) :** (१) व (२) जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी पाठविलेल्या अहवालानुसार, हे खरे आहे.

(३) अलिबाग तालुक्यातील समुद्र किनारी १५९ पैकी ६९ प्रकरणामध्ये व मुरुड तालुक्यातील समुद्रकिनारी १६७ अनाधिकृत बांधकामांपैकी ९५ अशी एकूण १६४ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३,५४ व ५५ अन्वये F.R.I दाखल करण्यात आले आहेत. तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडील दिनांक ०६/०१/२०११ रोजीच्या अधिसूचनेमधील निर्देशाचे उल्लघंन केल्याने भारतीय पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम ३(१) व १५ अन्वये अलिबाग व मुरुड तालुक्यामध्ये अनुक्रमे ६५ व ६७ प्रकरणांमध्ये मा.जिल्हा न्यायालय अलिबाग येथे तक्रारी दाखल करण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडील अहवालानुसार, अलिबाग तालुक्यातील समुद्र किनारी १५९ व मुरुड तालुक्यातील समुद्रकिनारी १६७ अनाधिकृत बांधकामे आहेत व अनुक्रमे ३० व ०७ अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत. तसेच इतर प्रकरणात दाखल केलेले दावे न्यायप्रविष्ट आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.